## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

### सुचना

संदर्भ :- १) जाहीरात क्र. पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१२ दिनांक २४ मार्च २०१२.

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत संदर्भांकित वरील जाहिरातीनुसार वाहन चालक या पदावर नियुक्ती करण्याकरीता एमकेसीएल यांचेकडे ऑनलाईन अर्ज भरलेल्या व विद्यापीठास प्राप्त झालेल्या यादीनुसार सर्व उमेदवारांना वाहन चालक पदाचे लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र विद्यापीठाव्दारे पोस्टाने पाठविण्यात आली आहेत. उमेदवारांना प्रवेशपत्राशिवाय (Hall Ticket) परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. सदर सर्व उमेदवारांची लेखी परिक्षा खालील नमुद केंद्रावर आयोजित केलेली आहे. तसेच या पदांसाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांची यादी विद्यापीठ संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव आणि परिक्षेची तारीख | परिक्षा केंद्राचे नांव | आसन क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | वाहन चालक<br>दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी<br>**सकाळी ११.०० ते १२.००** | कृषि महाविद्यालय, मुर्तिजापूर रोड, डॉ.पंदेकृवि, अकोला. | १००१ ते ११८१ |

संबंधित उमेदवारास विद्यापीठाने वरील पदासाठी पाठविण्यात आलेले **प्रवेशपत्र न मिळाल्यास** त्यांनी स्वतःचे नांव, जन्म तारीख व पत्ता असलेले फोटाओळखपत्र सोबत आणुन दिनांक १८ एप्रिल २०१५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३.०० या दरम्यान कुलसचिव कार्यालयामधील आस्थापना विभागातून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे. म्हणजे त्यांना लेखी परिक्षेस बसण्यास अडचण जाणार नाही. उपरोक्त पदांकरिता लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम लेखी परिक्षा प्रवेश पत्रावर नमुद करण्यात आलेला आहे..

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग प्रानिमं-२००७/प्र.क्रं ४६/०७/१३-अ दिनांक २७ जुन २००८ नुसार सदर लेखी परिक्षेस बसलेल्या उमदवारांनी लेखी परिक्षेमध्ये ४५% व त्या पेक्षा जास्त गुण प्राप्त उमेदवारांची गुणवत्ता यादी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. तसेच शासन निर्णय दिनांक ०५ जुन २०१४ नुसार वाहन चालक पदावर संबंधित उमेदवारांची निवड उमेदवाराने लेखी परिक्षेत व प्रात्यक्षिक/व्यावसायीक चाचणीत प्राप्त केलेल्या गुणावर, गुणवत्तेनुसार,मुलाखती न घेता करण्यात येईल.

उपरोक्त पदांचे लेखी परिक्षेनंतर उमेदवारांची प्रात्यक्षिक/व्यावसायीक चाचणी आणि त्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे. उमेदवारांची लेखी परिक्षेतील गुणवत्ता यादीनुसार किमान ४५% गुण प्राप्त केलेल्या पात्र उमेदवारांची प्रात्यक्षिक/व्यावसायीक चाचणी घेण्यात येईल या संबंधीची दिनांक, वेळ व स्थळ विद्यापीठ सकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल तसेच कागदपत्र पडताळणी बाबतचे वेळापत्रक सुध्दा योग्य वेळी विद्यापीठ संकेस्थळावर जाहीर करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र/लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवारानी याची नोंद घ्यावी. एखादा उमेदवार प्रमाणपत्र पडताळणी दरम्यान अपात्र आढळल्यास त्याचा लेखी परिक्षेतीलप्रात्यक्षिक/व्यावसायीक चाचणीत गुणवत्ता ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र असला तरी अश्या उमेदवारांना निवड प्रक्रीयेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

सदर पदावरील भरती प्रक्रीया व त्याकरता आयोजित लेखी परीक्षा अत्यंत पारदर्शक पध्दतीने राबविण्यात येत असल्यामुळे प्रक्रीये दरम्यान वा नंतर कोणी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविल्यास किंवा त्यासाठी पैशाची मागणी केल्यास संबंधित उमेदवारांनी अशा व्यक्तीचा/व्यक्तीची थेट नजीकच्या पोलीस स्टेशनला तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे आवश्यक पुराव्यासह तक्रार दाखल करावी व त्याबाबतची माहिती कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना कळवावी.

कृपया संबंधितांनी वरील बाबींची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६ एप्रिल २०१५

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला